आ. क्र. 1566 /

सायबर पोलीस ठाणे, नागपूर

दिनांक 23

# कार्यालय पोलीस आयुक्त, नागपूर शहर

पोलीस भवन, वेस्ट हायकोर्ट रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर.

दुरध्वनी क्र.0712–2590601 cp.nagpur@mahapolice.gov.in

1566

551

क्रमांक :–पोआना/जी–1/पोलीस भवन/वातानुकुलीत संयंत्रे/वा.से.क/ 8316 /2026 नागपूर दिनांक :– ~~12/05/2026~~ 23/06/26

विषय :– पोलीस नियंत्रण कक्ष येथील "कमांड कंट्रोल सेंटर" ( C.C.C.) "कोनार्क" कंपनीच्या लिफ्टचा वार्षिक देखभाल करार करण्याबाबत

@ PI Cyber to put up on website 30/06

***

उपरोक्त विषयान्वये 'पोलीस नियंत्रण कक्ष येथील "कमांड कंट्रोल सेंटर" ( C.C.C.) 'कोनार्क' कंपनीच्या लिफ्टचा वार्षिक देखभाल करार करण्याबाबत वार्षिक देखभाल व दुरूस्तीचा सेवाकरासाठी (Non comprehensive Annual Maintenance Contract ) **(एक वर्षाकरीता )** सोबत जोडलेल्या अटी आणि शर्तीची पुर्तता करीत असलेल्या स्थानीक बाजारपेठीतील नामांकित/प्रतिष्ठीत/इच्छुक पुरवठादार/मेसर्स यांच्याकडुन दरपत्रके मागविण्यात येत आहे.

तांत्रिक आणि आर्थिक दरपत्रके वेगवेगळया सीलबंद लिफाफ्या मध्ये, आवश्यक असणारे सर्व स्पेअर पार्टसचे विश्लेषणासह व त्यांच्या किंमतीसह या कार्यालयास प्रसिध्दीच्या दिनांकापासुन 07 दिवसांचे आंत या कार्यालयास पोहचेल अश्या बेताने सादर करावीत. विहीत कालमर्यादेनंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार करण्यात येणार नाही.

( मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे मान्यतेने )

( राहुल माकणीकर )
पोलीस उपआयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे करिता

HC-1-7-26
PC-

प्रति,

केअर टेकर, 'पोलीस भवन–ए विंग', नागपूर शहर

2/– सदर पत्राची व अटी व शर्तीची एक प्रत सुचना फलकावर लावण्यात यावी.

प्रतिलीपी :– पोलीस उपआयुक्त, सायबर सेल, नागपूर शहर

2/– सदर पत्र व अटी व शर्तीस नागपूर शहर पोलीस यांच्या अधिकृत वेबसाईटवर व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

प्रत :– वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस नियंत्रण कक्ष, नागपूर शहर

# पोलीस नियंत्रण कक्ष येथील "कमांड कंट्रोल सेंटर" (C.C.C.)
## 'कोनार्क' कंपनीच्या लिफ्टचा वार्षिक देखभाल करारासाठी
## ( Non comprehensive Annual Maintenance Contract )
## अटी आणि शर्ती

1) सेवा पुरवठादाराने **'कोनार्क'** कंपनीच्या 01 लिफ्टची सर्व्हिसिंग, देखभाल आणि दुरूस्ती करायची आहे, तसेच लिफ्टच्या देखभालीसाठी आवश्यक असलेले सर्व सेवा नियमित अंतराने आणि लिफ्टच्या स्थितीची स्वरूपानुसार सहायक पोलीस आयुक्त, कमांड कंट्रोल सेंटर, नागपूर शहर यांना आवश्यक वाटेल तितक्या वारंवार पुरवायच्या आहेत.

2) तांत्रिक आणि आर्थिक दरपत्रके वेगवेगळया सीलबंद लिफाफ्या मध्ये, आवश्यक असणारे सर्व स्पेअर पार्टसचे विश्लेषणासह व त्यांच्या किंमतीसह सहायक पोलील आयुक्त, कमांड कंट्रोल सेंटर, पोलीस नियंत्रण कक्ष, नागपूर शहर यांचे मार्फतीने प्रसिध्दीच्या दिनांकापासुन कार्यालयीन 07 दिवसांचे आंत सादर करणे अनिवार्य राहिल. **सरळ मार्गाने येणारे दरपत्रके ग्राहय धरली जाणार नाहीत.**

3) वार्षिक देखभाल करारासाठी (Non comprehensive Annual Maintenance Contract ) दर उद्धृत करण्यापूर्वी, निविदा देणा–यांना लिफ्टची प्रत्यक्ष स्थिती पाहण्यासाठी भेट देणे.

4) **'कोनार्क'** कंपनीच्या 01 लिफ्टच्या मासिक सर्व्हिसिंग, नियमित तपासणी आणि प्रतिबंधात्मक देखभालीमध्ये खालील बाबींचा समावेश असेल.

| | |
|---|---|
| **A** | लिफ्टच्या देखभालीच्या कामामध्ये मशीन रूम/कंट्रोल पॅनल/गिअर बॉक्स/सर्व दरवाजे/कार टॉप/ फिल्ड स्विचेस/पुशर बटन्स/जंक्शन बॉक्सेस/पिट इत्यादींची स्वच्छता समाविष्ट आहे. |
| **B** | फिल्ड स्विचेस, डोअर कॉन्टॅक्ट्स, डोअर सेन्सर, पुश बटन्स आणि पॉवर कॉन्टॅक्टर्स, ड्राइव्ह युनिट्स यांची स्वच्छता, कार्यात्मक तपासणी आणि समायोजन. |
| **C** | जेव्हा आवश्यक असेल तेव्हा स्पेअर्स बदलणे, सर्व नियंत्रक, पॉवर केबल्स आणि टर्मिनल्सची घट्टपणा तपासणे. |
| **D** | तपासणी करून आवश्यकतेनुसार गिअर बॉक्स ऑईल बदलविण्याची कार्यवाही करणे, पुली, गाईड रेल्सचे वंगण घालणे, मोटर्सना ग्रीसींग करणे. कार तसेच काउंटर वेट या दोन्हींच्या उचलण्याच्या दोरीचा घट्टपणा तपासणे. |
| **E** | गर्व्हनर आणि त्याच्या सुरक्षा उपकरणांची तपासणी करणे. |
| **F** | लिफ्ट इन्स्टॉलेशनच्या प्रवासाच्या गुणधर्मांची, विशेषतः त्यांच्या थांबण्याच्या अचुकतेची तपासणी आणि समायोजन करणे. |
| **G** | स्विचेस, डिस्प्ले, प्रकाश उपकरणे आणि इतर सुरक्षा उपकरणांची दृष्य आणि कार्यात्मक तपासणी करणे |
| **H** | सर्व दरवाजे आणि त्यांच्या लॅंडिंग लॉक्सची तपासणी करणे |
| **I** | प्रत्येक लिफ्टच्या सर्व आपत्कालीन अलार्म सर्किटची तपासणी करणे, ते सुस्थितीत असल्याची खात्री करणे आणि त्यावर केलेल्या सुधारणात्मक कारवाईसाठी वापरकर्ता विभागाला अहवाल देणे |
| **J** | लिफ्टच्या योग्य कार्यासाठी इतर सर्व संबंधित देखभाल कामे. |

5) बिघाड दुरूस्ती– मिळालेल्या तक्रारीनुसार, सेवा पुरवठादाराने कराराच्या कालावधीत कितीही बिघाडाच्या तक्रारी आल्या तरी त्या विनामुल्य अटेंड करणे आवश्यक आहे. त्याकरीता पुर्ण वेळ (24/7) तांत्रिक व सेवा कर्मचारी उपस्थित राहतील. बिघाड मध्ये नैसर्गिक आपत्ती जसे आग इ. तसेच उंदिर, गिलहरी तथा पक्षी यांच्यामुळे होणा–या नुकसानीचा सुध्दा समावेश असेल. सेवा पुरवठादाराकडे 06 तासांच्या आत

...यासाठी सक्षम तांत्रिक सहायक कर्मचारी असावेत. तक्रारींचे निवारण केल्यानंतर, ...रकाळ बिघाडासाठी 06 तासांत आणि मोठया बिघाडासाठी 24 तासांच्या आत (प्रसंगानुसार) लिफ्ट कार्यान्वित केली पाहिजे. **अडकलेल्या प्रवाशांसाठी तात्काळ प्रतिसाद देणे बंधनकारक राहील.**

6) बिघाडाचे निदान करून 06 तासांच्या आंत दोष दुरूस्त करणे. सदोष भागाची दुरूस्ती/बदल त्याच किंवा अधिक चांगल्या ब्रॅंडच्या स्पेअर पार्ट्सने 24 तासांच्या आत करणे आवश्यक राहिल. कोणतेही स्पेअर्स किंवा इतर वस्तू पुरवल्या जाणार नाहीत. हे सुनिश्चित केले जाईल की दुरूस्ती आणि देखभालीसाठी वापरलेले जाणारे सुटे भाग/वस्तु दोषमुक्त असतील. पुरवलेल्या वस्तू स्थापित आणि सर्वसाधारणे स्वीकारलेल्या मानकांनुसार, सर्वोच्च दर्जाच्या असतील. तांत्रिक व सेवा कर्मचारी यांच्या कमतरतेमुळे दुरूस्ती कामास खोळंबा निर्माण होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

7) महिन्यातुन किमान एकदा, सेवा पुरवठादाराने लिफ्ट उपकरणांची स्वच्छता आणि वंगण घालणे आवश्यक आहे, तसेच आवश्यक असल्यास, सध्याच्या आवृत्तीचे अलाइनमेंट/समायोजन/कॅलब्रिशन/प्रोग्रामिंग करणे आवश्यक आहे. यासाठी लागणारे सर्व साहित्य/उपभोग्य वस्तू सेवा पुरवठादाराने पुरवायच्या आहेत.

8) प्रतिबंधात्मक देखभालीची वारंवारता – महिन्यातून एकदा, प्रतिबंधात्मक देखभाल मासिक आधारावर केली पाहिजे आणि त्याचा अहवाल सहायक पोलीस आयुक्त, कमांड कंट्रोल सेंटर, नागपूर शहर यांना सादर करणे आवश्यक राहील.

9) सेवा पुरवठादाराने लिफ्टच्या प्रतिबंधात्मक देखभालीसाठी आपले सेवा अभियंते पर्यवेक्षक/तंत्रज्ञ नियुक्त करावेत. सेवा तंत्रज्ञ यांत्रिक, विद्युत आणि विद्युत प्रणालींची देखभाल करण्यास सक्षम असले पाहिजेत. यंत्रांची सर्व्हिसिंग 24/7 (आठवडयाच्या सुट्टया तथा सार्वजनिक सुट्टी सह सर्व दिवशी) व विहित वेळेत त्वरित बिघाड सेवा केली जाईल.

10) कामाच्या ठिकाणी होणा–या अपघाताची सर्व जबाबदारी निवीदाकाराची असेल.

11) काम करताना सार्वजनिक/शासकीय मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याची दुरूस्ती करून देण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे संयंत्राचे नुकसान झाल्यास, त्यासाठी ते सर्वस्वी जबाबदार राहतील.

12) कंत्राटदाराने प्रत्येक लिफ्टसाठी, देखभालीच्या कृतींचा तपशील नोंदवणारे लॉगबुक ठेवणे आवश्यक राहिल व ते लॉगबुक सहायक पोलीस आयुक्त, कमांड कंट्रोल सेंटर, नागपूर शहर यांच्या निगरानीत राहील व त्यास ते प्रमाणित करतील.

13) जर लिफ्ट 24 तासांपेक्षा जास्त काळ चालू राहिली नाही, तर प्रति लिफ्ट प्रति दिवस ₹ 1,000/– आकारला जाईल आणि सदरची रक्कम बिलांमधुन कापली जाईल.

14) पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्याकडे कोणत्याही कारणाशिवाय सर्व किंवा कोणतीही निविदा स्वीकारण्याचा/ नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आला आहे.

15) निविदाकार कडुन अपप्रचार, लाचखोरी, फसवणुक, तथ्थे दडवणे, चुकीची तथ्थे सांगणे आणि फसवणुकीच्या कृतींमूळे कामाच्या कोणत्याही टप्प्यावर निविदा नाकारली जाऊ शकते आणि काळया यादीत टाकण्याची प्रक्रिया सुरू केली जाऊ शकते.

16) निविदा अर्जामध्ये मागविण्यात आलेली संपुर्ण कागदपत्रे सादर करणे बंधनकाकर राहील. अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास त्यांची प्राईस बीड उघडण्यात येणार नाही.

17) सेवा पुरवठादाराला या कार्यालयाच्या पूर्व लेखी संमतीशिवाय या कंत्राटाअंतर्गत आपले हक्क आणि दायित्वे इतर कोणत्याही संस्थेला हस्तांतरीत, सोपवण्यास, गहाण ठेवण्यास किंवा उप–कंत्राट देण्यास परवानगी दिली जाणार नाही.

18) निवीदा सादर करताना किंवा त्यानंतरच्या टप्प्यावर निविदाकाराने या कार्यालयाला दिलेल्या तपशिलांचे पालन करणे बंधनकारक असेल. जर, कोणत्याही टप्प्यावर सादर केलेला असा कोणताही दस्तऐवज खोटा आढळ्यास, तो कंत्राटाच्या अटींचा भंग मानला जाईल आणि त्यामुळे कंत्राट रद्द करण्याव्यतिरिक्त त्याच्यावर/ तिच्यावर/त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल.

19) 1 टेक्नीशियन साईट वर सोमवार ते शनिवार सकाळी 10 ते 07 वाजेपर्यंत व आवश्यकतेनुसार सुट्टीच्या दिवशी सुध्दा हजर राहतील.

20) दरपत्रकावर रीतसर स्वाक्षरी व शिक्का मारलेला असावा आणि किमती कोणत्याही खोडतोडीशिवाय, अक्षरात व अंकात स्पष्टपणे लिहिलेल्या/टाईप केलेल्या असाव्यात. काही दुरूस्त्या किंवा खोडतोडी असल्यास, दरपत्रकाराने त्यावर प्रतिस्वाक्षरी करणे आवश्यक आहे, अन्यथा दरपत्रके नाकारले जाईल.

21) दरपत्रकारांना दरपत्रकाचे दस्तऐवजाचा काळजीपूर्वक अभ्यास करण्याचा सल्ला देण्यात येत असुन, दरपत्रकाचा काळजीपुर्वक अभ्यास आणि तपासणी केल्यानंतर, तसेच त्यांचे परिणाम पूर्णपणे समजून घेऊन दरपत्रके सादर केली आहे असे मानले जाईल.

22) कागदपत्रे :–

1) वैध जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र
2) वैध पॅन
3) नागपूर शहरामध्ये "लिफ्ट" च्या देखभालीची कामे करण्यासाठी विद्युत निरीक्षक विभाग/ लिफ्ट निरीक्षक विभागाकडुन मिळालेला वैध परवाना/नोंदणी/अधिकृतता.
4) अधिकृतता प्रमाणपत्र :– जर निवीदाधारक हा मुळ उपकरण निर्माता नसेल तर परवाना आणि अधिकृतता पत्र आवश्यक.
5) 'साईट' वर उपलब्ध राहणारे तंत्रज्ञानाचे व कर्मचा–यांचे परवाने व ओळखपत्र. सेवा तंत्रज्ञ यांत्रिक, विद्युत आणि विद्युत प्रणालींची देखभाल करण्यास सक्षम असल्याबाबतचे पुरावे.
6) मागील कामे समाधानकारकरित्या पुर्ण केल्याबाबतचे संबंधित विभागाचे प्रमाणपत्र तसेच अनुभव प्रमाणपत्र.
7) काळया यादीत नाव नसल्याबाबत तसेच निविदाधारक दिवाळखोर नसल्याचे प्रमाणपत्र.
8) निविदाधारकास PT किंवा PTRC क्लिअरन्स प्रमाणपत्र फर्म नोंदणीच्या प्रकारानुसार सादर करणे बंधनकारक राहील.
9) ईएसआय, ईपीएफ नोंदणीचा पुरावा.

23) देय रक्कम :–

1) प्रत्येक 03 महिन्यांचा सेवा कालावधी पूर्ण झाल्यावर, सेवा समाधानकारकरित्या पार पाडली गेली आहे असे सहायक पोलीस आयुक्त, कमांड कंट्रोल सेंटर, नागपूर शहर यांचे प्रमाणपत्राह, त्रैमासिक देयके 03 प्रतीत या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. उपलब्ध अनुदानाच्या अनुषंगानेच देयकाची रक्कम अदा करण्यात येईल. अनुदाना अभावी देयकाची रक्कम अदा करण्यास विलंब झाल्यास त्यावर कोणतेही अतिरिक्त व्याज देय होणार नाही.
2) वार्षिक देखभाल करार हा सर्वसमावेशक नसुन त्यात सदोष भागांची दुरूस्ती असुन बदली यांचा समावेश नाही. लिफ्टशी संबंधीत कोणत्याही हार्डवेअर, सॉफटवेअर आणि इतर वस्तूंच्या दुरूस्ती साठी सेवा पुरवठादाराकडुन कोणतीही स्वतंत्र बिले सादर केली जाणार नाहीत.

3) सदोष भागांची बदली करीता सर्वप्रथम जॉब कार्ड बनवुन ते सहायक पोलीस आयुक्त, कमांड कंट्रोल सेंटर, नागपूर शहर यांना दाखवुन, सदोष भागांची बदली करीता कार्यवाही करावी. त्याचे स्वतंत्र बिले सादर करावीत. बदलविलेले सदोष भाग हे लाईन दाफेदार यांच्याकडे व्यवस्थित जमा करण्यात यावीत. व त्याची रितसर नोंदवही लाईन दफेदार हाताळतील.

4) प्रतिबंधात्मक देखभाल किंवा बिघाडाच्या वेळी उपस्थित राहण्यासाठी सेवा कर्मचा–यांना पाठवण्याचा वाहतुक खर्च, असल्यास, तो कंत्राटदाराने स्वतः सोसावा लागेल.

5) कोणतीही आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

6) या कार्यालयाला दिलेल्या सेवेपोटी, वेळोवेळी संबंधित कर संकलन प्राधिकरणाकडे, प्रचलित नियमांनुसार सर्व कर, उपकर इत्यादी जमा करण्यास देखील कंत्राटदार जबाबदार असेल, आकारण्यात येणा–या देयकामधुन नियमानुसार टीडीएस आणि जीएसटी कपात करण्यात येईल.

( राहुल माकणीकर )
पोलीस उपआयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे करिता